# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.10.2024** **वारःबुधवार**

---

1. राज्यातल्या सुमारे 7 हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी आज पंतप्रधान दूरस्थ पद्धतीनं करणार
2. हरियाणा विधानसभा निवडणूकीत भाजपाला स्पष्ट बहुमत तर जम्मू काश्मीरची सत्ता नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीकडे
3. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण; अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार प्रदान आणि
4. राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर चालवणार-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातल्या सुमारे 7 हजार 600 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी दूरस्थ पद्धतीने करण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर मधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचं आधुनिकीकरण आणि शिर्डी विमानतळाच्या नव्या इमारतीच्या कामाचा समावेश आहे.

राज्यातल्या 10 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलडाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोलीमध्ये ही महाविद्यालयं आहेत. पंतप्रधान भारतीय कौशल्य विकास संस्थेचंही उद्घाटन करतील. टाटा शिक्षण आणि विकास ट्रस्टच्या सहयोगानं ही संस्था सुरू केली जात आहे.

हे सर्व कार्यक्रम आज दुपारी होणार असून राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे.

**<u>जम्मू-काश्मीर</u>**

जम्मू आणि काश्मीर तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीची मतमोजणी काल झाली. जम्मू काश्मीरमधे 90 मतदारसंघापैकी 42 ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्सला तर 29 जागांवर भाजपाला यश मिळालं. हरियाणामध्ये 90 मतदारसंघांपैकी 48 ठिकाणी भाजपा उमेदवार तर 36 ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत.

दरम्यान हरियाणामधे भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल मुंबईतल्या प्रदेश कार्यालयात भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत काल जल्लोष साजरा करण्यात आला.

**<u>राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार</u>**

70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आलं. या कार्यक्रमात अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना काल दादासाहेब फाळके जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि माहिती आणि प्रसारण विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरूगन या वेळी उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त चित्रपट समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणतील, असा विश्वास राष्ट्रपतींनी या वेळी व्यक्त केला. तर चित्रपट क्षेत्रासाठी सरकार करत असलेल्या सुधारणांची माहिती वैष्णव यांनी दिली.

सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सन्मान 'अट्टम' या मल्याळम चित्रपटाला मिळाला. 'उंचाई' या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून गौरवण्यात आलं. सर्वोत्कृष्ट समीक्षकाचं सुवर्ण कमळ दीपक दुआ यांना प्रदान करण्यात आलं. 'कांतारा' या कन्नड चित्रपटासाठी ऋषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. तर 'तिरुचित्रमबलम' या तमिळ चित्रपटासाठी नित्या मेनन यांना आणि 'कच्छ एक्सप्रेस' या गुजराती चित्रपटासाठी मानसी पारेख यांना सर्वोत्कृष्ट नायिका म्हणून गौरवण्यात आलं.

कथाबाह्य चित्रपट विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार 'आदिगुंजन' या मराठी माहितीपटासाठी सोहिल वैद्य यांना, तर सर्वोत्कृष्ट निवेदनाचा पुरस्कार याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना देण्यात आला. सर्वोत्कृष्ट कला आणि संस्कृती आधारित चित्रपट म्हणून सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' या मराठी माहितीपटाला गौरवण्यात आलं. तर 'आणखी एक मोहेंजोदारो' हा मराठी माहितीपट सर्वोत्कृष्ट चरित्रपटात्मक / ऐतिहासिक पुनर्निर्माण / संकलित चित्रपट ठरला. कथाधारित चित्रपट विभागात परीक्षक विशेष उल्लेख पुरस्कार गुलमोहर या चित्रपटासाठी मनोज वाजपेयी यांना प्रदान करण्यात आला.

**<u>वनहक्क-पालघर</u>**

अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी यांचे वन हक्क निश्चित करून त्यांना प्रदान करण्यात पालघर जिल्हा देशात आणि राज्यातही प्रथम क्रमांकावर आहे. त्याबाबतचा हा वृत्तांत.....

**पालघर जिल्हयात आजपर्यंत 50,069 वैयक्तिक दावे मंजुर झाले असून त्यांचे क्षेत्र 29,750.90 हेक्टर आर इतके आहे. संपुर्ण देशाचा विचार करता देशामध्ये एकुण 23,71,921 इतके वैयक्तिक दावे मंजुर झाले असुन त्यात महाराष्ट्राचा वाटा 1,98,504 इतका आहे. त्यापैकी 50,069 वैयक्तिक दाव्यांच्या मंजुरीसह पालघर जिल्हा देशात तसचं राज्यात वनहक्क दावे मंजुर करण्यात अग्रस्थानी आहे. आदिवासिंच्या वन पट्ट्यांसाठी सतत लढणाऱ्या श्रमजीवी संघटनेच्या सीता घाटाळ यांनी वन पट्ट्यांविषयी माहिती देताना सांगितलं, हे वन पट्टे मिळाले अनेक आदिवासी बांधव हे त्यावर चांगल्या प्रकारे भाजीपाला लागवड, आंबा लागवड, केळी लागवड यासारख्या पिकांची लागवड करून त्यातून बारमाही उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक पाठबळ मिळत आहे. त्यामुळे अशा प्रकारे जर आदिवासी समुदायाला वन पट्टे मिळाले तर ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होवू शकतील. आणि त्यांचं स्थलांतर थांबण्यास मदत होवू शकेल. आकाशवाणी बातम्यांसाठी पालघरहून नीतू चौरे.**

**<u>मुख्यमंत्री-उपसा योजना-सोलापूर</u>**

राज्यातील सर्वच उपसा सिंचन योजना आता सौर ऊर्जेवर चालवण्यात येणार असल्यामुळे या सिंचन योजनांचा संपूर्ण फायदा मिळू शकेल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सोलपुरात एका कार्यक्रमात व्यक्त केला.

राज्यातल्या कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी अनेक जिल्ह्यात उपसा सिंचन योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजनांच्या मोठ्या वीज बिलांमुळे त्या योजना चालविणे कठीण होते. मात्र आता या योजना सौर उर्जेवर काम करतील; त्यासाठी त्यासाठी केंद्र शासनानं राज्य शासनाला जवळपास 29 हजार कोटी रुपयांचा निधी दिला असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. सौरउर्जेमुळे वीज पोहचली नसेलल्या गावांनाही याचा लाभ होईल. यामधून पहिल्या टप्यात 12 हजार तर दुसऱ्या टप्यात 3 हजार कोटी रुपयांची कामं सुरू असल्याची फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

**उजनी भूमीपूजन**

भीमा उजनी प्रकल्पा अंतर्गत देगाव शाखा कालव्याच्या कामांचं भूमिपूजन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. या कामासाठी 352 कोटी रुपये खर्च येणार असून याचा लाभ दक्षिण सोलापूर तालुक्यातल्या दहा गावे आणि अक्कलकोट तालुक्यातल्या 25 गावांना होणार आहे. या प्रकल्पामुळे 16 हजार 129 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन या भागातल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार असल्याचं समाधान फडणवीस यांनी व्यक्त केलं.

**राममंदीर**

अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन इमारत बांधणीचं भूमिपूजन काल करण्यात आले. महाराष्ट्रातील जनतेसाठी हा आनंदाचा क्षण असल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितलं. सुमारे साडेनऊ हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर 12 मजली भक्त निवास उभं राहणार असून त्या ठिकाणी 650 पर्यटक राहू शकतील. पुढील तीन वर्षात हे बांधकाम पूर्ण करण्याचं नियोजन आहे.

**म्हाडा**

म्हाडाच्या मुंबईतील विविध गृहनिर्माण योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या 2 हजार 30 सदनिकांच्या विक्रीसाठी काल मुंबईत संगणकीय सोडत काढण्यात आली. 'प्रधानमंत्री आवास योजना', 'मोदी घरकुल आवास योजना' यांच्या माध्यमातून अल्प, मध्यम उत्पन्न गटातील नागरिकांसाठी राज्यात साडे सात लाख घरे बांधण्यात आली असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी यावेळी दिली.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी काल विजांसह पाऊस झाला. गडचिरोली आणि लगतच्या गावांमध्येही काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झालं.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार